**प्रेसनोट** दि. १५/०४/२०२५

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयातील पिंपरी पोलीस स्टेशनमधील पोलीस उप निरीक्षक यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | पिंपरी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय २४ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. निलेश रमेश बोकेफोडे, वय ३८ वर्ष, पद – पोलीस उप निरीक्षक, पिंपरी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे. (वर्ग-२, अराजपत्रित) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४०,०००/- (चाळीस हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ३०,०००/- (तीस हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३०,०००/- (तीस हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | ११/०४/२०२५ व दि. १२/०४/२०२५ |
| सापळा दिनांक | १५/०४/२०२५ रोजी |
| ठिकाण | पिंपरी पोलीस स्टेशन अंतर्गत मोहननगर पोलीस चौकी येथे, पुणे |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. प्रविण निंबाळकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९५५२५७४१४०) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे विरुद्ध पिंपरी पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्यात त्यांना मदत करणेसाठी व नमूद गुन्ह्यात तक्रारदाराचे जप्त करण्यात आलेले वाहन सोडविण्यासाठी लोकसेवक निलेश बोकेफोडे यांनी तक्रारदाराकडे ४०,०००/- रुपयाची लाच मागणी केल्याची तक्रार दि. ११/०४/२०२५ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. ११/०४/२०२५ व दि. १२/०४/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक निलेश बोकेफोडे यांनी तक्रारदाराविरुद्ध दाखल गुन्ह्यात मदत करण्यासाठी व गुन्ह्यात जप्त केलेले वाहन सोडविण्यासाठी सुरुवातीस ४०,००० रुपयाची लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती ३०,००० रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले. आज दि. १५/०४/२०२५ रोजी लोकसेवक निलेश बोकेफोडे यांनी तक्रारदाराकडून वरील नमुद कारणासाठी पिंपरी पोलीस स्टेशन अंतर्गत मोहन नगर पोलीस चौकी येथे ३०,००० (तीस हजार) रुपये लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारले असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्यांचे विरुद्ध पिंपरी पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड आयुक्तालय येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक विजय चौधरी, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

१५/४/२५

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक
सत्यमेव जयते
ॲन्टी करप्शन ब्युरो

Scanned with CamScanner